# समांतरवर शंका, कार्यशाळेत निरसन

**औरंगाबाद/प्रतिनिधी**

शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था १ जानेवारीपासून समांतर जलवाहिनी प्रकल्प राबविणाऱ्या ठेकेदाराकडे हस्तांतरित करण्यात येणार आहे. समांतरच्या बाबतीत असलेल्या सर्वसामान्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी उद्या (दि.३०) सकाळी १० ते दुपारी १२ पर्यंत संत एकनाथ रंगमंदिर आणि दुपारी ३ ते ५ या वेळेत संत तुकाराम नाट्यगृह सिडको येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

**आज दोन ठिकाणांवर आयोजन**

शहराची भविष्यातील पिण्याच्या पाण्याची गरज ओळखून सन २०४१ ची लोकसंख्या गृहीत धरून महानगरपालिकेने समांतर जलवाहिनी प्रकल्प हाती घेतला आहे. हा प्रकल्प पीपीपी तत्त्वावर राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या प्रकल्पासाठी केंद्र-राज्य शासनाचे अनुदानही मिळणार आहे. समांतर-मनपाच्या करारानुसार १ जानेवारी २०१३ पासून शहराची संपूर्ण पाणीपुरवठा योजना पुढील २० वर्षांसाठी संचलन, देखभाल-दुरुस्ती व नवीन योजनेच्या बांधकाम करिता कन्सेशनर यांना हस्तांतरित करण्यात येत आहे.

समांतर जलवाहिनीची माहिती, कामाचे नियोजन, नागरिकांना द्यावयाच्या सेवा सुविधा, भविष्यात पाणीपुरवठ्याबाबत वाढविण्यात येणारे सेवा स्तर याबाबत सविस्तर माहिती शहरातील नागरिकांना व्हावी या उद्देशाने उद्या (दि.३०) दोन ठिकाणी कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेत सुरुवातीला प्रकल्पासंदर्भातील सविस्तर सादरीकरण करण्यात येणार आहे. त्यानंतर नागरिकांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन करण्यात येणार आहे. या कार्यशाळेला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मनपाच्या वतीने प्रकल्पप्रमुख तथा कार्यकारी अभियंता सखाराम पानझडे यांनी केले आहे.